संत गाडगे बाबा
अमरावती विद्यापीठ
(नॅकद्वारा 'अ' श्रेणी मानांकीत)

**SANT GADGE BABA**
**AMRAVATI UNIVERSITY**
**(Accredited with 'A' Grade by NAAC)**

छत्तिसावा दीक्षांत समारंभ
**THIRTY SIXTH ANNUAL CONVOCATION**

ना. श्री. संजय धोत्रे

मा.राज्यमंत्री, मानव संसाधन विकास,
दूरसंचार, ईलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान, भारत सरकार
यांचे

# दीक्षांत भाषण

# Convocation Address
**by**
**Shri Sanjay Dhotre**

**Hon'ble Union Minister of State for Ministry of Human Resource Development**
**Communications, Electronics and I.T.**
**Government of India**

शुक्रवार, दिनांक २० डिसेंबर, २०१९
**Friday, the 20th of December, 2019**

**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती**

**छत्तिसावा दीक्षांत समारंभ**

**दि. २० डिसेंबर २०१९**

**प्रमुख अतिथी खासदार मा. श्री. संजय धोत्रे यांचे भाषण**

नमस्कार!

सुसंस्कृत, बुद्धिवादी, विवेकनिष्ठ समाजाच्या जडणघडणीत मोलाचे योगदान देणारे वैराग्यमूर्ती संत गाडगे बाबा व बहुजनांच्या शिक्षणाचे शिल्पकार आणि कृषिक्रांतीचे अग्रदूत भाऊसाहेब डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या पवित्र स्मृतीस मी सर्वप्रथम वंदन करतो.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या छतिसाव्या दीक्षांत समारंभाचे अध्यक्ष महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल महामहीम श्री. भगतसिंह कोश्यारीजी, समारंभास उपस्थित संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे विद्यमान कुलगुरू डॉ. मुरलीधर चांदेकर, तसेच समारंभास उपस्थित पूर्व-कुलगुरू, विद्यमान प्र-कुलगुरू, अधिसभा, व्यवस्थापन व विद्वत परिषद तसेच विविध प्राधिकरणांचे सदस्य, विविध विद्याशाखांचे अधिष्ठाता, लोकप्रतिनिधी, प्राचार्य, शिक्षक, विद्यापीठाचे अधिकारी, शिक्षकेतर कर्मचारी, शिक्षणप्रेमी नागरिक, पत्रकार बंधू आणि माझ्या विद्यार्थी मित्रांनो...

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या छत्तिसाव्या दीक्षांत समारंभास उपस्थित राहण्याची संधी मला आज लाभली, याचा मला विशेष आनंद आहे.

सन १९८३मध्ये महाराष्ट्र दिनी स्थापन झालेल्या या विद्यापीठांतर्गत पश्चिम विदर्भातील पाच जिल्ह्यांचा समावेश होतो. आज रोजी सुमारे ४ लक्ष विद्यार्थी या विद्यापीठांतर्गत विद्यार्जन करीत आहेत. सन २०१०मध्ये NAACचे बी ग्रेडिंग असलेले विद्यापीठ सन २०१६मध्ये reaccreditationनुसार A ग्रेडिंगमध्ये मोडते, ही बाब अभिनंदनीय व विद्यापीठाच्या निरंतर प्रगतीचे निदर्शक आहे.

ज्या पूजनीय संताच्या नावे विद्यापीठाचे नामाभिधान करण्यात आले आहे, त्या संत गाडगे बाबांच्या शैक्षणिक विचारांचे पाईक होणे ही आपली सर्वांची जबाबदारी आहे. संत गाडगे बाबा कायम म्हणायचे की, “कर्मकांड हे समाजास अधोगतीकडे नेते” म्हणूनच त्यांनी

विज्ञानवादी दृष्टिकोनाचा प्रसार आणि प्रचार करायला सुरुवात केली. संत गाडगे बाबांनी आपल्या दशसूत्रीमध्ये भुकेल्यांना अन्न, वस्त्र नसणाऱ्यांना वस्त्र, घर नसणाऱ्यांना घराचा निवारा, काम नसणाऱ्यांना रोजगार, मुक्या प्राण्यांना अभय इत्यादी बाबी नमूद केल्या व याच दशसूत्रीमध्ये त्यांनी गरीब विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा मूलमंत्र या समाजाला दिला.

दिनांक ८ नोव्हेंबर १९५३ रोजी गाडगे बाबा बांद्रा येथील आपल्या शेवटच्या कीर्तनात म्हणतात की, "आतातरी मुलाले शिक्षण द्या, पैसे नाही म्हणाल तर जेवणाचं ताट मोडा, हातावर भाकरी खा, बायकोले लुगडं कमी भावाचं घ्या, इवायाला पाहुनचार करू नका, पण मुलाले शाळेत घातल्याविना सोडू नका." सन १९५२मध्ये त्यांनी 'श्री गाडगे बाबा मिशन' स्थापन करून महाराष्ट्रभर शिक्षण संस्था व धर्मशाळा स्थापन केल्या. संत गाडगे बाबांचे शिक्षणविषयक विचार सामाजिक न्यायाच्या दृष्टीने आजही महत्त्वाचे आहेत. अशा संतांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या भूमीत आपण आज आहोत व त्यांच्या नावाने कार्यरत विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभास उपस्थित राहण्याची संधी मला मिळाली, हे माझे भाग्यच आहे.

विद्यार्थी मित्रहो, आज तुमचा दीक्षांत समारोह आहे. महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण करून तुम्ही समाजाच्या व्यासपीठावर पदार्पण करणार आहात. आपण संपादन केलेल्या ज्ञानाच्या आधारे आपणास स्वतःच्या विकासासोबतच समाजाची जडणघडण व राष्ट्र उभारणीच्या कार्यासाठी आपले योगदान द्यावयाचे आहे. संपादित ज्ञानाचा मी मानव कल्याणासाठी उपयोग करेल, अशी दीक्षा घेऊन तुम्ही सर्वजण समाजसेवेसाठी वचनबद्ध व्हाल, असा मला विश्वास आहे.

स्वातंत्र्याच्या ७० वर्षानंतरही भारतात उच्च शिक्षणाचा विस्तार अजून पुरेसा झालेला नाही, ही कटू वस्तुस्थिती आहे. १२५ कोटी लोकसंख्या असलेल्या भारत देशात विद्यापीठांची संख्या ९००च्या आसपास आहे. प्रगत देशांच्या तुलनेत ही संख्या निश्चितच कमी आहे. भारताच्या एक चतुर्थांश लोकसंख्या असलेल्या अमेरिकेत २५००पेक्षा जास्त विद्यापीठे आहेत, तर ज्याच्याशी भारताची तुलना होते त्या चिनमध्ये २०००पेक्षा अधिक विद्यापीठे आहेत. आपणास किती मोठा पल्ला गाठायचा आहे, हे यातून स्पष्ट होते. अलीकडेच केंद्रीय मनुष्यबळ विकास विभागाने ऑल इंडिया हायर एज्युकेशन सर्व्हे (AIHES) जाहीर केला आहे. या अहवालानुसार उच्च शिक्षण घेणाऱ्यांचे प्रमाण (Gross Enrollment Ratio- GER) २६.३ %

असल्याचे दिसून येते. नवे सहस्रक सुरू होत असताना हे प्रमाण १० % कमी असल्याने आणि त्याच सुमारास "तरुणांच्या वाढत्या संख्येच्या लाभाची" (Demographic Dividend) चर्चा होत असल्याने चिंता व्यक्त केली जात होती. आता हे प्रमाण २५ %पर्यंत पोचले, ही बाब समाधानकारक असली तरी यामध्ये सुधारणेस मोठा वाव आहे.

सर्वसमावेशक व गुणवत्तापूर्वक उच्च शिक्षणासाठी मनुष्यबळ विकास मंत्रालय नेहमीच प्रयत्नशील असते. याच अनुषंगाने केंद्र सरकारने 'पंडित मदन मोहन मालवीय राष्ट्रीय शिक्षक व शिक्षण मिशन' (PMMMNMTT) सुरू केले आहे. सन २०१३पासून 'राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान' (RUSA) राबविण्यात येत असून या माध्यमातून राज्यातील विद्यापीठांना आणि सरकारी व अनुदानित महाविद्यालयांना सक्षम केले जात आहे. याद्वारे विद्यापीठ आणि सरकारी कॉलेजमधील शैक्षणिक गुणवत्ता अधिक दर्जेदार करण्यासाठी व पायाभूत सोयीसुविधा पुरविण्यासाठी 'रुसा'ने पाठबळ दिले आहे.

अलीकडेच भारत सरकारच्या मनुष्यबळ विकास खात्याने नवीन शैक्षणिक धोरण २०१९चा मसुदा जनतेसमोर ठेवला असून पूर्व प्राथमिकपासून उच्च शिक्षणापर्यंत अनेक बदल यामध्ये सुचवले आहेत. इस्रोचे माजी अध्यक्ष डॉ. के. कस्तुरीरंगन यांच्या अध्यक्षतेखाली ९ सदस्यीय समितीने हा मसुदा तयार केला आहे. उच्च शिक्षण संस्थांच्या स्वायत्ततेला आणि गुणवत्तेला प्राधान्य देणे, गुणवत्तापूर्ण संशोधनाला चालना देण्यासाठी 'राष्ट्रीय संशोधन मंडळ/ संस्थे'ची स्थापना करणे, उच्च शिक्षणासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाच्या जागी 'राष्ट्रीय उच्च शिक्षण नियंत्रण मंडळ' (NHERA) यंत्रणा उभारणे, सन २०३०पर्यंत उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेणाऱ्यांची संख्या दर्शविणारा ढोबळ नोंदणी प्रमाण निर्देशांक ५० %पर्यंत वाढविण्यासाठी प्रयत्न करणे इत्यादी बाबींचा मसुद्यामध्ये समावेश आहे.

व्यावसायिक शिक्षण हा उच्च शिक्षणाचा अविभाज्य भाग असणे ही काळाची गरज आहे. याच अनुषंगाने व्यावसायिक शिक्षणामध्ये कौशल्याधारित शिक्षणाचे पदवी आणि पदविका अभ्यासक्रम सुरु करणे, व्यावसायिक अभ्यासक्रमातील पदव्युत्तर शिक्षण आणि संशोधन यांना चालना देणे, व्यावसायिक अभ्यासक्रम शिकविण्यासाठी उच्च गुणवत्तेचे शिक्षक निर्माण

करण्यासाठी विद्यापीठे व महाविद्यालये यांच्यामध्ये स्वतंत्र विभाग निर्माण करणे या बाबी नवीन शैक्षणिक धोरणाअंतर्गत विचाराधीन आहेत.

आज आधुनिक शेतीच्या नावाखाली व अधिक उत्पादन वाढविण्याच्या हव्यासापोटी शेतकरी रासायनिक खतांचा व अत्यंत प्रभावी अशा कीटकनाशकांचा बेसुमार वापर करीत आहे. त्यामुळे काही प्रमाणात शेतमालाचे उत्पादन वाढले असले किंवा पिकांवरील रोगांना काही प्रमाणात आळाही बसला असेल, परंतु त्यामुळे शेतीचा कस कमी होऊन जमिनीची सुपीकता मात्र कमी झाली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचा उत्पादनखर्च भरमसाठ वाढला असून त्या प्रमाणात शेतमालाचे उत्पादन होत नसल्याने शेतकऱ्यांचा फारसा आर्थिक विकास होऊ शकलेला नाही. भारतामध्ये पूर्वी नैसर्गिक शेती करण्यात येत होती, त्याद्वारे जमिनीचा पोत टिकवून ठेवून शेतकरी उत्पादन घेत होता व त्याआधारे सुखी व संपन्न जीवन जगत होता. मी तर म्हणेन की आज पुनः आम्हाला पूर्वीप्रमाणेच नैसर्गिक शेतीकडे वळणे गरजेचे झाले आहे. मा. पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या नेतृत्वाखाली चालू वर्षाच्या अर्थसंकल्पामध्ये नैसर्गिक शेतीस वाव देऊन शेतकऱ्यांचा उत्पादन खर्च कमी करून निव्वळ उत्पन्न वाढविणे यावर भर देण्यात आला आहे.

आज विज्ञान-तंत्रज्ञान-उद्योग यांत नवकल्पनांना महत्त्व प्राप्त झालेले आहे. इनोव्हेशन-इन्क्युबेशन हे कळीचे शब्द झालेले आहेत. इनोव्हेशन उपक्रम आज आपल्याला राबवावे लागतात. ते पूर्वी जीवनात अंतर्भूत होतेच. ग्रामीण जीवनातील कल्पकतेतून विद्यार्थ्यांनी नवकल्पनांबाबत प्रेरणा घ्यायला हवी. आज स्टार्टअप कल्चर आलेले आहे. नोकरीच्या मागे न लागता विद्यार्थ्यांनी विविध प्रकारचे उद्योग सुरू करावेत यासाठी केंद्र शासनाचे प्रयत्न सुरू आहेत. त्याचाच एक भाग म्हणून आता विद्यापीठांच्या माध्यमातून स्टार्टअपसाठी चालना देण्यात येते. माझ्या मते, ही सध्याचा काळातील विद्यार्थ्यांना उपलब्ध झालेली चांगली संधी आहे. नवकल्पनांवर आधारित उद्योग-व्यवसाय यांत पुढे जाण्यासाठी विद्यार्थिदशेतच काही मार्गदर्शन आणि प्रोत्साहन मिळत असेल, तर बेरोजगारीची समस्या सुटण्यास निश्चितच हातभार लागू शकेल. आपण कष्ट करण्यास प्राधान्य दिले पाहिजे तसेच कोणत्याही क्षेत्रात काम करण्याची तयारी ठेवली पाहिजे. कुशल मनुष्यबळाची या देशाला खूप आवश्यकता आहे. मात्र आवश्यकतेप्रमाणे कुशल विद्यार्थी मिळत नाहीत, ही उद्योगजगताची ओरड आहे. छोट्या-

गोष्टी कौशल्यांची आवश्यकता तर दैनंदिन जीवनात विविध क्षेत्रांत पदोपदी भासते. सूत्रसंचालन करणारे, अहवाललेखन करणारे, वृत्तलेखन करणारे, डीटीपी करणारे, साध्या साध्या ब्लडशुगर टेस्ट यांपासून तर वेगवेगळ्या प्रकारच्या क्वालिटी कंट्रोल टेस्ट, चाचण्या करणारे-गुणवत्ता तपासणारे, दुभाषी, भाषांतरकार, स्टेनोग्राफर, छोटे-मोठे तंत्रज्ञ, उत्तम शिक्षक-अध्यापक एक नव्हे अनेक कौशल्यांची व ती आत्मसात केलेल्या व्यक्तींची समाजाला गरज आहे. ती आवश्यकता पूर्ण करणाऱ्यांना निश्चितच रोजगार उपलब्ध होऊ शकतो. स्टार्टअप क्षेत्र विशेष नावीन्यपूर्ण दृष्टीला प्रोत्साहन देण्यासाठी व उद्योग उभे करण्यासाठी पुढे येत आहे. आज देशात अनेक तरुण एकत्र येऊन नवीन उद्योग कल्पना अमलात आणत आहेत. स्वावलंबी बनवण्यासाठी आपण स्टार्टअपचा अवलंब करावा, असे मी सांगेन. देश उद्योग-व्यवसायांतून पुढे न्यायचा असेल तर स्टार्टअपशिवाय पर्याय नाही. स्टार्ट अपद्वारे आपल्या नवीन क्षमतांना पूर्णपणे वाव मिळेल, असा मला विश्वास वाटतो.

याशिवाय आपण विविध प्रकारच्या प्रक्रिया उद्योगांकडे लक्ष पुरवायला हवे. प्रक्रिया उद्योगांना मोठ्या प्रमाणावर वाव आहे. यातून रोजगारनिर्मितीला चालना मिळू शकते. आज नवनवीन क्षेत्र उदयाला येत आहेत. काही क्षेत्र नव्याने प्रतिष्ठित झाले आहेत. कृत्रिम बुद्धिमत्ता, ऑटोमेशन, जेनेटिक इंजिनिअरिंग यांच्यापासून तर डिजिटल वित्तीय व्यवस्था, दृकश्राव्य माध्यमे, दूरसंचार तंत्रज्ञान-माहिती संपादन, माहिती विश्लेषण (डेटा ॲनालिसिस) इत्यादी क्षेत्रांतून घडणाऱ्या बदलांकडे आपण लक्ष द्यायला पाहिजे. या क्षेत्रांतून नवनवीन संधी उपलब्ध होऊ शकतील.

विद्यार्थी मित्रहो, दिवसेंदिवस जमिनीतील पाण्याची पातळी अधिकाधिक खोल जात आहे. पाण्याचे दुर्भिक्ष्य निर्माण होत आहे. बेसुमार वृक्षतोड होत असल्यामुळे पर्यावरणाचा समतोल बिघडत आहे. जमिनीची उत्पादकता घटत आहे. औद्योगिकीकरण व वाहनांच्या संख्येत प्रचंड वाढ झाल्यामुळे फार मोठ्या प्रमाणावर वायू प्रदूषण होत आहे. तसेच ग्लोबल वॉर्मिंगसारख्या समस्येमुळे संपूर्ण जीवसृष्टीसमोर संकट निर्माण झाले आहे. एकदा वापरात येणाऱ्या प्लॅस्टिकचा अतिवापर तसेच घनकचरा व इलेक्ट्रॉनिक कचरा व्यवस्थापनासंदर्भातील भीषण समस्या आपल्यासमोर आ वासून उभ्या आहेत. या समस्यांवर तुम्ही घेतलेल्या ज्ञानाच्या आधारे उपाय शोधण्याची तुम्हा तरुण पिढीची जबाबदारी आहे. संपूर्ण सजीव सृष्टीला समृद्ध

करणाऱ्या नैसर्गिक स्रोतांचे जतन करून व संवर्धन करून येणाऱ्या पिढ्यांना शुद्ध हवा, शुद्ध पाणी व समतोल पर्यावरण उपलब्ध करून देणे हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. तुम्ही सर्वजण पदवीधर म्हणून येथून बाहेर पडत आहात. तुम्ही कोणत्याही क्षेत्रात गेलात तर त्या ठिकाणी या अनुषंगाने आपण आपले योगदान द्यावे, असे मी आवाहन करतो.

काळानुसार जीवनाचे प्रश्न बदलत जातात. सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, सांस्कृतिक वेगवेगळ्या प्रश्नांकडे विद्यार्थ्यांचे लक्ष जायला हवे. स्थानिक आणि जागतिक प्रश्नांचे आपल्याला भान यायला हवे. त्याकडे एक चळवळ म्हणून पहायला हवे. स्त्री-पुरुष समानतेचा पुरस्कार करणाऱ्या आजच्या काळात, महिला सक्षमीकरणावर भर देतानाच, महिलांवरील अत्याचार, बलात्कार यांसारख्या घटना घडणार नाहीत, यासाठी काळजी घ्यायला हवी. महिलांचा सन्मान हीच माणुसकी असे मूल्य आपण प्रस्थापित केले पाहिजे. संतवाङ्मय, प्रबोधन परंपरा यांच्या माध्यमातून समाजात मूल्यसंस्कार टिकविला पाहिजे. संत गाडगे बाबा, तुकडोजी महाराज यांच्या प्रबोधनपरंपरेशी विद्यार्थ्यांनी आपले नाते टिकवून ठेवायला हवे.

विद्यार्थी मित्रहो, जीवनात मार्गक्रमण करताना अनेक अडचणी मार्गात येतील. त्याला तोंड द्या. अटल बिहारी वाजपेयी यांच्या कवितेतील ओळींप्रमाणे,

**"बाधाएं आंती हैं आएं**
**घिरें प्रलय की घोर घटाएं,**
**पावों के नीचे अंगारे,**
**सिर पे बरसें यदि ज्वालाएं,**
**निज हाथों में हंसते-हंसते,**
**आग लगाकर जलना होगा ।**
**कदम मिलाकर चलना होगा।"**

हिंमतीने जीवनातील अडथळ्यांचा-संकटांचा सामना करा. यशस्वी व्हा. आकाशात उंच भरारी घ्या. त्यासाठी तुम्हाला शुभेच्छा देतो.

धन्यवाद!

जय हिंद! जय भारत!

✠ ✠ ✠